सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : २९ | बुधवार, दि. २२ ऑक्टोबर २०२५ | पाने : ४

अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

## निवेदन

बुधवार, दि. २२ व गुरुवार, दि.२३ ऑक्टोबर २०२५ रोजी पाडवा व भाऊबीजेनिमित्त 'दै. ग्लोबल महातेज'च्या कार्यालयास सुटी राहील. त्यामुळे गुरुवार, दि.२३ ऑक्टोबर व शुक्रवार, दि. २४ ऑक्टोबर रोजी अंक प्रसिद्ध होणार नाही. याची वाचक, वितरक, जाहिरातदार, हितचिंतक यांनी नोंद घ्यावी. **– संपादक**

## दिनविशेष

२२ ऑक्टोबर

- पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते भाक्रा धरण राष्ट्राला अर्पण करण्यात आले.
- भारतीय उद्योगपती नवीनभाई सी. दवे यांना ब्रिटनच्या महाराणी एलिझाबेथ यांचा उद्योग व शिक्षण क्षेत्रातील कार्याबद्दल कोट ऑफ आर्म्स पुरस्कार जाहीर.
- भारताने पहिल्या मानवविरहित चांद्रयान-1 चे प्रक्षेपण केले.

## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

**स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!**




... पान २

# पंधरा वर्षे दिवाळीला कुटुंबाचा दुरावा

## एसटी बसचालक अनंत कराड सेवेत राहून देताहेत प्रवाशांना सेवा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

राज्य परिवहन महामंडळाची बस ही सर्वसामान्य प्रवाशांची लालपरी आहे. एसटीचा प्रवास हा सुरक्षित असल्याने महामंडळ आणि एसटी कर्मचाऱ्यांवर प्रवाशांचा गाढा विश्वास आहे. कमी दरात सेवा देणारी लालपरी प्रवाशांच्या जीवाभावाची आहे. दिवाळी, दसरा, गणेशोत्सव, पंढरपूरची वारी व कोणत्याही सण-उत्सवासाठी प्रवाशांच्या सेवेत एसटी तत्पर असते. त्यामुळे एसटीचे प्रवासी हेच कुटुंब समजून प्रवाशांसह एसटी कर्मचारी दिवाळी, भाऊबीज साजरी करतात. गेली १५ वर्षे दिवाळीत घरापासून लांब राहून चालक अनंत कराड प्रवाशांच्या सेवेत राहून प्रवाशांच्या आनंदात समाधान मानत आहेत.

अहिल्यानगरमधील पाथर्डीतील अनंत कराड हे पुण्यातील शिरूर आगारात २०११ मध्ये चालक या पदावर रुजू झाले. ज्या दिवसापासून चालकाची खाकी वर्दी अंगात घातली त्यावेळेपासून झटून काम करण्यास सुरूवात केली. दरवर्षी ते दिवाळी ही कुटुंबीयांपासून दूर राहून, मुलांच्या हट्टाकडे दुर्लक्ष करून, राज्यातील कोणत्याही आगारात कर्तव्य बजावत होते. दरदिवाळी गावापासून, शिरूर आगारापासून लांब सेवा बजावत होते. यावर्षीही कराड हे नाशिकमधील त्र्यंबकेश्वर आगारात कर्तव्य बजावत आहेत.

वर्षभर कुटुंबीयांपासून लांब राहून काम करून, दिवाळी सणानिमित्त कुटुंबीयांना भेटण्यासाठी अनेकजण गावी येतात. कुटुंबीयांसोबत सण साजरा करतात. तसेच शाळा, महाविद्यालयांना दिवाळीच्या सुट्या सुरू झाल्या, की मुले मामाच्या, नातेवाईकांच्या गावी जातात. परंतु ऐन दिवाळीत एसटी कर्मचारी कुटुंबापासून दूर राहून एसटी प्रवाशांची सेवा करतात. गावातून शहरात आणि शहरातून गावात जाणाऱ्या प्रवाशांना एसटीने सोडण्याचे काम करतात. यावेळी एसटी महामंडळामधील सर्व कर्मचाऱ्यांच्या रजा रद्द केल्या जातात. ९९ टक्के कर्मचारी बाहेरील आगारात कर्तव्य बजावतात. चालक कराड गेली १५ वर्षे दिवाळीच्या पाचही दिवशी घरी न थांबता, सुटी न घेता एसटी प्रवाशांची ने-आण करत आहेत.


एसटी आगारातील स्थानिक कर्मचाऱ्यांसह दिवाळी साजरी केली जाते. स्थानिक कर्मचारी मुक्कामासाठी आलेल्या

पान ३ वर



# दिवाळीचा गोडवा हरवला...!

## आनंदाचा शिधा गायब; ज्वारीने घेतली गव्हाची जागा



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**रजनीकांत पाटील**

शासनाच्या अन्न व नागरी पुरवठा विभागातर्फे रेशनधारकांना दरमहा अंत्योदय आणि प्राधान्य कुटुंब योजनेंतर्गत धान्याचे वितरण केले जाते. दरमहा ३५ किलो धान्य दिले जाते. मात्र, काही महिन्यांपासून या लाभार्थ्यांना ज्वारी देखील दिली जात आहे. दिवाळीतही 'आनंदाचा शिधा' ऐवजी ज्वारीचे वाटप करण्यात आले. त्यामुळे लाभार्थ्यांमधून सरकारच्या धोरणावर तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. राज्यातील शिधापत्रिकाधारकांना या वर्षीच्या दिवाळीत 'आनंदाचा शिधा' देण्यात आलेला नाही. राज्यातील १९ जिल्ह्यांमधून शिधापत्रिकाधारकांना गव्हाचे प्रमाण कमी करून ज्वारी देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे अनेकांना 'भाकरी खाऊन दिवाळी साजरी करावी लागणार' अशी प्रतिक्रिया व्यक्त होत आहे. शासनाचा हा निर्णय मागील हंगामातील ज्वारीच्या जादा खरेदीमुळे घेण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले. अंत्योदयधारकांना रेशनवर साखर देणेही बंद केले आहे. वर्षभरापासून या योजना बंद आहेत. शासनाच्या या बदलत्या धोरणामुळे गरिबांनी काय खावे? असा प्रश्न लाभार्थ्यांमधून या निमित्ताने उपस्थित केला जात आहे.

**ज्वारीच्या बंपर खरेदीमुळे निर्णय**

राज्यात गेल्यावर्षी तसेच यंदाही ज्वारीचे उत्पादन मोठ्या प्रमाणात झाले आहे. सरकारने त्याची मोठ्या प्रमाणात खरेदी केली आहे. त्यामुळे अन्न व नागरी पुरवठा विभागाने प्रत्येक जिल्ह्यातील रेशन दुकानांमधून ज्वारीचे वाटप करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार लाभार्थ्यांना रेशनमधून ज्वारीचे वाटप केले जात आहे. या संदर्भात तालुका पुरवठा अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता तो होऊ शकला नाही.



**श्री मंगळग्रह मंदिरात दरवर्षी लक्ष्मीपूजन हा विशेष कार्यक्रम असतो. यंदाही लक्ष्मीपूजनानिमित्त मंदिरात मंगळवार, दि. २१ ऑक्टोबर रोजी माता लक्ष्मी आणि श्री गणेश यांची विधीवत पूजा तसेच मंत्रोच्चार, धूप-दीप, पंचामृत स्नान आणि नैवेद्य अर्पण करण्यात आला. याप्रसंगी मंगळग्रह सेवा संस्थेचे सचिव सुरेश बाविस्कर यांच्या हस्ते लक्ष्मीपूजन करण्यात आले.**

# लक्ष्मीपूजनाला सोने महागले; खरेदीसाठी उत्साह कायमच!



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

लक्ष्मीपूजनाच्या मुहूर्तावर जळगावातील सुवर्ण बाजाराने अक्षरशः जोरदार झेप घेतली. लक्ष्मीपूजनाचा मुहूर्त साधून सोने खरेदी करण्याचा विचार करणाऱ्या ग्राहकांना जोरदार झटका बसला. गेल्या तीन दिवसांपासून सोन्याच्या दरात घसरण सुरू होती. मात्र, मंगळवार, दि. २१ ऑक्टोबर रोजी सोन्याचे दर २४ तासांत जीएसटीसह २५०० रुपयांनी वधारले. सध्या सोन्याचा दर १ लाख ३४,४०० रुपये प्रतितोळा आहे. तर चांदीचा भाव प्रतिकिलो १ लाख ७४ हजारांपर्यंत पोहोचला आहे.

या वर्षीच्या सुरूवातीपासूनच सोन्याच्या दरात मोठी वाढ झाली आहे. विशेषतः सोन्याने सलग नऊ आठवडे तेजी नोंदविली आहे. २०२५ या वर्षात सोन्याच्या दरात जवळपास ६५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. जागतिक पातळीवरील अस्थिरता, काही देशांच्या मध्यवर्ती बँकांनी केलेली खरेदी, जागतिक तणाव अशा विविध कारणांमुळे सोन्याच्या दरात जोरदार वाढ झाल्याचे दिसून येत आहे.

## बलिप्रतिपदा सोने खरेदीसाठीचा अर्धा मुहूर्त

*साडेतीन मुहूर्तांपैकी एक महत्त्वाचा मुहूर्त आणि सोने घ्यायचेय मग कॅरेट म्हणजे काय? हे आधी समजून घ्या. सोन्याच्या शुद्धतेचे माप म्हणजे सोने जितके शुद्ध तितका त्याचा कॅरेट उच्च. आता २४ कॅरेट सोने म्हणजे काय? तर जवळपास १०० टक्के शुद्ध सोने हे लक्षात ठेवा. या सोन्याचे दागिने बनत नाहीत. हे सोने फक्त बिस्कीट, कॉइन आणि गुंतवणुकीसाठी वापरले जाते. २२ कॅरेट जेथे ९१.६ टक्के सोने म्हणजे शुद्ध असते. दागिन्यांसाठी सर्वसामान्यपणे २२ कॅरेट सोनेच निवडले जाते. त्यानंतर येते १८ कॅरेट सोने. जेथे ७५ टक्के शुद्ध सोने असते. रोजच्या वापरासाठी अतिशय उत्तम. कारण हे थोडे कठीण असते आणि टिकाऊही असते. मग येते १४ कॅरेट सोने. ज्यात करता ५८.५ टक्के इतके सोने असते. मग ९ कॅरेटचे सोने. जेथे सोने हे अवघ्या ३७.५ टक्के असते. हे सोने खरेदीसाठी स्वस्तही असते. पण तितकेच कमी शुद्ध असते. जितका कॅरेट कमी तितकी त्याची शुद्धता कमी. आता दागिने घेताना शुद्धतेची अधिक खात्री करा. हॉलमार्क आहे का? हे पाहिलेच पाहिजे. दैनंदिन वापरासाठी १८ कॅरेट, लग्नासाठी २२ कॅरेट आणि गुंतवणुकीसाठी २४ कॅरेट सोने बेस्ट आहे. तुम्ही कोणत्या कॅरेटचे सोने निवडणार आहात? हे आवर्जून ठरवा.*

# दिवाळी असूनही शेतकऱ्यांचा कापूस घरातच

## 'सीसीआय' खरेदी केंद्र बंद असल्याने पदरी निराशा; खासगी व्यापारीही देईना भाव

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेरसह तालुक्यात अतिवृष्टीमुळे व बदलत्या हवामानामुळे कापसाच्या उत्पादनात घट झाली आहे. सीसीआयचे खरेदी केंद्रही वेळेवर सुरु न झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. दिवाळी असूनही कापूस घरातच असल्याने शेतकऱ्यांची घोर निराशा झाली आहे. दिवाळीच्या आनंदाला ते पारखे झाले आहेत.

दरवर्षी दिवाळीच्या कापूस खरेदी केंद्र सुरू होतात. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळत होता. राज्यात १५ ऑक्टोबरपासून १५० ठिकाणी खरेदी केंद्र सुरू केले जातील, असे सीसीआयचे कार्यकारी संचालक ललितकुमार गुप्ता यांनी जाहीर केले होते.

मात्र, अद्यापही हे खरेदी केंद्र सुरू झालेले नाहीत. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांना साडेसहा ते सात हजार रुपये प्रति क्विंटलने व्यापाऱ्यांना कापूस विकावा लागला. क्विंटलमागे शेतकऱ्यांचे हजार ते दीड हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात जाण्याची वेळ आली आहे. अमळनेर तालुक्यात ६९ हजार हेक्टर जमीन पेरणीयोग्य आहे. त्यापैकी ७० टक्के कापसाची लागवड आहे.

अतिवृष्टीमुळे उत्पादन घटल्याने शेतकऱ्यांच्या तोंडाचा घासही हिरावला गेला आहे. सीसीआय खरेदी केंद्र लवकर सुरू करावे, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

> तयार कापूस पावसात भिजून काळवंडला. त्याची किंमत अर्ध्याहूनही कमी मिळत आहे. एवढी मेहनत करूनही सर्व काही पाण्यात गेले आहे. दिवाळी तर दूरच. पुढचे पीक घेण्याची चिंता लागली आहे. शासनाने ओला दुष्काळ जाहीर करून आर्थिक मदत देणे गरजेचे आहे.
>
> **– विजय पाटील,** शेतकरी, मंगरूळ (ता. अमळनेर)



**मीनाबाई पाटील यांच्या घरात साठवलेला कापूस.**

> १५ ऑगस्टनंतर झालेल्या सततच्या पावसाने कापसावर लाल्याचा प्रादुर्भाव झाला. कापसाची वाढ खुंटल्याने प्रचंड नुकसान झाले. यामुळे खरीप हंगामही वाया गेला आहे. प्रशासनाकडून सरसकट पंचनामेही झाले नाहीत. यामुळे शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळाली नाही. बाबा पण गेल्या आणि दशम्याही गेल्या अशी गत शेतकऱ्यांची झाली.
>
> **– प्रा. सुभाष पाटील,** जिल्हाध्यक्ष, किसान काँग्रेस, जळगाव.

> यावर्षी सततच्या पावसाने सर्व गणित बिघडले आहे. पिकावर फवारणी, मजुर, खतांवर मोठा खर्च झाला. उत्पादनात मोठी घट आली आहे. त्यातच सीसीआय केंद्र बंद असल्याने कापूस घरातच पडून आहे. यामुळे आमची दिवाळी यंदा अंधारातच आहे. शासनाने तातडीने खरेदी केंद्र सुरू करून, दिलासा द्यावा.
>
> **–हिरकनबाई पाटील,** शेतकरी, पिंपळे (ता. अमळनेर)

> अतिवृष्टीमुळे अर्धा कापूस शेतातच सडला. उरलेला कापूस काढून आणला तरी बाजारात भाव नाही. विकला तर नुकसान आणि घरात ठेवला तर तो खराबही होतो. लागवडीसाठी कर्जाचा डोंगर उभा राहिला आहे. हे कर्ज कसे फेडावे, याची चिंता सतावत आहे. शासनाने तातडीने नुकसान भरपाई द्यावी.
>
> **– मीनाबाई पाटील** शेतकरी, जैतपीर (ता. अमळनेर)

> आमच्या शिवारात तीन दिवस पाणी साचले होते. कापसाची झाडे आडवी पडली. कापूस पूर्णतः चिखलात रुतला होता. एवढे कष्ट करूनही हाती काहीही लागले नाही. सरकारी मदतही मिळालेली नाही. सणाच्या दिवसात आनंदाऐवजी फक्त कर्जाचा हिशोब लावून ते फडावे कसे याची चिंता सतावत आहे.
>
> **– वसंत पाटील,** शेतकरी, शिरूड (ता. अमळनेर)

## आपली दिवाळी, स्वदेशी दिवाळी
### दिवाळी आपल्यासाठीही अन् गरिबांसाठीही





स्वदेशीचा अंगीकार करीत स्थानिक खरेदीला महत्त्व देऊया.. गरीब, कष्टकरी, मध्यमवर्गीय, छोटे उद्योजक, छोटे व्यावसायिक, स्थानिक कारागीर, महिला बचत गट यांच्या उत्पादनांना खरेदी करूया.. त्यांच्या घरातही प्रकाशपर्व साजरे करण्यासाठी आपण हातभार लावूया.. प्रकाशपर्व, आनंदपर्व आणि समृध्दीपर्व म्हणजेच दिवाळी.. चला, जागे व्हा..! परदेशी वस्तूंना झुगारूया.. ऑनलाईन तथा विदेशी उत्पादनांच्या खरेदीऐवजी स्वदेशीच उत्पादने खरेदी करूया..!

स्वदेशी उत्पादने खरेदी करून देशाला आणि गरजूंना बळ देऊया...!
हीच खरी तुमची, आमची, आपल्या सर्वांचीच दिवाळी...!!



# महाकाय डायनासोरचा अंत कसा झाला ? शास्त्रज्ञांचे धक्कादायक खुलासे



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महाकाय डायनासोर नामशेष होण्याच्या कारणांविषयी नेहमीच चर्चा होते. लाखो वर्षांपूर्वी पृथ्वीवर राज्य करणाऱ्या या महाकाय प्राण्यांचा अचानक अंत कसा झाला, याबाबत शास्त्रज्ञांचे अनेक सिद्धांत आहेत. काही दावे तर इतके धक्कादायक आहेत, की ते ऐकून वाचकही आश्चर्यचकित होतात. आम्ही शास्त्रज्ञांच्या नवीनतम संशोधनांवर आधारित काही प्रमुख खुलासे सांगणार आहोत. चला तर मग जाणून घेऊया.

डायनासोर नामशेष होण्याची पार्श्वभूमी
डायनासोर हे मेसोजोइक युगातील (२५२ ते ६६ मिलियन वर्षांपूर्वी) प्रमुख प्राणी होते. ते सुमारे १६५ मिलियन वर्षे पृथ्वीवर राज्य करत होते. मात्र, ६६ मिलियन वर्षांपूर्वी झालेल्या क्रिटेशस-पॅलिओजीन (K-Pg) विनाशकारी घटनेमुळे पृथ्वीवरील ७५% जीवन नष्ट झाले, ज्यात डायनासोरांचा समावेश होता. या घटनेच्या मागे नेमके काय कारण होते, याबाबत शास्त्रज्ञ अजूनही संशोधन करत आहेत. पारंपरिक सिद्धांतांपासून ते नवीनतम शोधांपर्यंत, यात अनेक धक्कादायक तथ्ये आहेत.

**प्रमुख सिद्धांत : लघुग्रहाचा धडका आणि इरिडियमची भूमिका**
शास्त्रज्ञांच्या म्हणण्यानुसार, डायनासोरच्या नामशेष होण्याचे मुख्य कारण मेक्सिकोच्या युकाटान प्रायद्वीपाजवळील चिक्सुलुब खाडीत १० किलोमीटर व्यासाचा लघुग्रह पृथ्वीवर आदळला. या धडकेमुळे प्रचंड ऊर्जा मुक्त झाली. जी अणुबॉम्बच्या लाखो पट होती.

**परिणामी :**
धूळ आणि इरिडियमचा प्रभाव : धडकेमुळे वातावरणात प्रचंड धूळ आणि सल्फर भरली. यात इरिडियम नावाचा दुर्मीळ धातू मोठ्या प्रमाणात पसरला. इरिडियम हे अंतराळातील खडकांमध्ये आढळते. पृथ्वीवर दुर्मीळ आहे. खडकांमध्ये आढळलेल्या इरिडियमच्या उच्च पातळीमुळे शास्त्रज्ञांना हा धडका शोधायला मदत झाली. इरिडियममुळे सूर्यप्रकाश अडला. ज्यामुळे वर्षानुवर्षे अंधार आणि थंडी निर्माण झाली. वनस्पती नष्ट झाल्या. अन्नसाखळी तुटली आणि प्राणी उपाशी मरण पावले.
**धक्कादायक तथ्य :** हा धडका इतका शक्तिशाली होता, की पृथ्वीच्या वातावरणात सल्फरचे प्रमाण इतके वाढले, की ते जीवनासाठी घातक ठरले. मात्र, २०२५ मध्ये प्रसिद्ध झालेल्या एका अभ्यासानुसार सल्फरचा हा प्रभाव इतका घातक नव्हता जितका आधी गृहीत धरले जात होते. हा धडका डायनासोरच्या विनाशाचा मुख्य कारणीभूत घटक मानला जातो.

**डायनासोर आधीच नामशेष होत होते का? नवीन संशोधनाचा खुलासा**
२०२५ मध्ये प्रसिद्ध झालेल्या एका अभ्यासानुसार (करंट बायोलॉजी जर्नलमध्ये), शास्त्रज्ञांनी उत्तर अमेरिकेतील जीवाश्म अभिलेखांचे विश्लेषण केले. यात धक्कादायक दावा केला गेला आहे. डायनासोर लघुग्रह धडक्यापूर्वी नामशेष होत नव्हते. आधीचा समज असा होता, की लघुग्रह धडक्याच्या १८ मिलियन वर्षांपूर्वी डायनासोरांच्या प्रजातींची संख्या कमी होत होती.

**नवीन मॉडेलनुसार :**
– डायनासोरांच्या चार प्रमुख गटांचे निवास क्षेत्र स्थिर राहिले होते. विलोपनाचा धोका कमी होता.
– जीवाश्म अभिलेखातील अभावामुळे त्यांची घट वाटत होती. पण प्रत्यक्षात ते स्थिर होते.
हा शोध डायनासोरांच्या इतिहासाला नव्याने लिहिणारा आहे. जर लघुग्रह धडका न झाला असता, तर डायनासोर आजही पृथ्वीवर असते, असा दावा शास्त्रज्ञ करतात.

**दुसरा लघुग्रह धडका? ' नेचर ' जर्नलमधील दावा**
२०१६ मध्ये ' नेचर ' जर्नलमध्ये प्रसिद्ध झालेल्या संशोधनात शास्त्रज्ञांनी गुआनाच्या किनाऱ्याजवळील पाण्याखालील दुसरा खड्डा शोधला. हा चिक्सुलुबप्रमाणेच मोठा असावा असा दावा आहे. यानुसार दोन लघुग्रह धडके झाल्याने पृथ्वीवर अशी परिस्थिती निर्माण झाली, की डायनासोरांसह बहुसंख्य प्राणी नष्ट झाले. मात्र हा सिद्धांत अजूनही वादग्रस्त असल्याने अधिक संशोधनाची गरज आहे.

**इतर संभाव्य कारणे :**
**ज्वालामुखी आणि हवामान बदल**
डेकन ट्रॅप्स ज्वालामुखी : भारतातील डेकन ट्रॅप्समधील प्रचंड ज्वालामुखी उद्रेक (६६ मिलियन वर्षांपूर्वी) यामुळे कार्बन डायऑक्साइड आणि सल्फर वातावरणात मिसळले. ज्याने हवामान बदल घडवले. २०२४ च्या संशोधनानुसार हे उद्रेक थंडी निर्माण करणारे होते. त्याचा प्रभाव लघुग्रह धडक्यापूर्वीच संपला होता. म्हणून ज्वालामुखी एकटा कारण नव्हता.
**हवामान बदल आणि रोग :** काही सिद्धांतांनुसार हवामानातील चढ-उतार, रोग आणि समुद्री पातळीतील बदल यामुळे डायनासोर कमकुवत झाले असावेत. मात्र, लघुग्रह धडका हाच अंतिम ठोकाच होता.

### डायनासोरच्या विनाशाचा परिणाम
या घटनेमुळे पृथ्वीचे पर्यावरण पूर्णपणे बदलले. जंगले वाढली, नद्या आणि मातीचे स्वरूप बदलले. यामुळे स्तनप्राणी आणि पक्षी (जो डायनासोरांचे वंशज आहेत) यांना संधी मिळाली आणि आधुनिक जीवनाचा पाया रचला गेला. डायनासोरचा अंत हा पृथ्वीच्या इतिहासातील एक मोठा टर्निंग पॉइंट होता.

**(टीप : हा लेख शास्त्रीय संशोधनांवर आधारित आहे. नवीन शोध सुरू असल्याने माहिती बदलू शकते. अधिक माहितीसाठी विश्वसनीय स्रोतांचा संदर्भ घ्यावा.)**

# एका डझनात नेहमी १२ च वस्तू का? यामागील गणित, इतिहास आणि विज्ञान

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

' डझन ' हा शब्द इंग्रजीतील dozen पासून आला आहे. जो लॅटिन शब्द duodecim (अर्थ : बारा) वरून तयार झाला. आपण बाजारात केळी, अंडी किंवा मिठाई खरेदी करताना ' डझन ' हा शब्द नेहमी ऐकतो. पण डझनमध्ये नेहमी १२च वस्तू का असतात? १० किंवा ११ का नाही? यामागे फक्त परंपरा नाही, तर गणित, इतिहास अ ाणि विज्ञान यांचा एक मनोरंजक संगम आहे.

**प्राचीन गणनेचे रहस्य**
**आज आपण दशमान** पद्धत (Decimal System) वापरतो. जी १० वर आधारित आहे. परंतु प्राचीन काळात इजिप्त, रोम आणि बाबिलोनसारख्या संस्कृतींमध्ये १२ वर आधारित गणनापद्धत प्रचलित होती. १२ ला ' पूर्ण चक्र ' मानले जायचे. कारण एका वर्षात १२ महिने, घड्याळात १२ तासांचा चक्र आणि वर्तुळाला १२ समान भागांत विभागणे सोपे होते. यामुळे १२ ही संख्या पूर्णता आणि संतुलनाचे प्रतीक बनली.

**व्यापारात १२ चे महत्त्व**
प्राचीन युरोपात व्यापारात १२ ला व्यावहारिक एकक म्हणून स्वीकारले गेले. कारण १२ चे अर्धे (६), चतुर्थांश (३) किंवा सहावे (२) भाग काढणे सोपे होते. यामुळे हिशेबात चुका होण्याची शक्यता कमी होत असे. हळूहळू ही पद्धत रूढ झाली आणि १२ वस्तू म्हणजेच ' एक डझन ' असे मानले जाऊ लागले.

**' बेकर्स डझन ' म्हणजे काय?**
काही ऐतिहासिक माहितीनुसार मध्ययुगीन इंग्लंडमध्ये ' बेकर्स डझन ' म्हणून १३ वस्तूंचा समूह मानला जायचा. बेकरीवाले ब्रेड किंवा बन विकताना १२ ऐवजी १३ तुकडे देत. जेणेकरून वजनात कमतरता असल्यास ग्राहकांचे नुकसान होऊ नये. हा १३ वा तुकडा बोनस म्हणून दिला जायचा. तरीही १२ ही संख्या ' पूर्ण ' वाटल्याने तीच डझन म्हणून प्रचलित झाली.

### १२ ची जादू
१२ चे गणितीय आणि सांस्कृतिक महत्त्व आहे. 12 ला 1, 2, 3, 4, 6 आणि 12 असे सहा भाग करणारे विभाजक (divisors) आहेत, तर १० ला फक्त २ आणि ५ असे दोनच विभाजक आहेत. यामुळे १२ हा अंक गणन आणि मोजमापासाठी अधिक लवचिक आहे. शिवाय १२ महिने, १२ राशी आणि घड्याळातील १२ तास यामुळे १२ ही संख्या आपल्या जीवनात खोलवर रुजली आहे.
एका डझनात १२ वस्तू असण्यामागे परंपरा, गणित आणि व्यावहारिकता यांचा सुंदर मेळ आहे. मग ती अंडी असोत, केळी असोत किंवा मिठाई, १२ चा हा आकडा आपल्याला पूर्ण आणि संतुलीत वाटतो. म्हणूनच डझन ही संकल्पना आजही आपल्या दैनंदिन जीवनात आणि व्यापारात कायम आहे.

# रेल्वे स्टेशनचे नाव काळ्या अक्षरात पिवळ्या बोर्डवरच का लिहिलेले असते?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

रेल्वेने प्रवास करणे हा एक रोमांचक आणि वेगळा अनुभव असतो. तुम्हीही कधी ना कधी रेल्वेने प्रवास केला असेल. अशा वेळी तुम्ही नोटीस केले असेल, की कोणत्याही स्टेशनवर पोहोचलात तर प्लॅटफॉर्मवर स्टेशनचे नाव पिवळ्या रंगाच्या बोर्डवर काळ्या अक्षरात लिहिलेले असते. यामागचे नेमके कारण काय? असा प्रश्न कधी पडला आहे का ? आपण याचे उत्तर जाणून घेऊया.

**सुरक्षा कारणे :** पिवळा रंग लोकांच्या डोळ्यांवर जास्त परिणाम करतो, लक्ष वेधून घेतो. रेल्वे स्टेशनवर पिवळे बोर्ड लावल्यामुळे लोको पायलटला लांबूनच स्टेशन दिसते. यामुळे त्यांना वेळेत ब्रेक लावण्याची किंवा वेग कमी करण्याची तयारी करता येते. हे अपघात टाळण्यासाठी अतिशय महत्त्वाचे आहे.


**काळ्या अक्षरांचा उपयोग :** काळा रंग पिवळ्या पार्श्वभूमीवर उच्च कॉन्ट्रास्ट निर्माण करतो. ज्यामुळे अक्षरे अधिक स्पष्ट दिसतात. दुरूनही वाचणे सोपे जाते. अगदी गडद रात्री किंवा धुक्यातही.

**आंतरराष्ट्रीय सराव :** फक्त भारतातच नव्हे; तर अनेक देशांमध्ये सार्वजनिक वाहतुकीत पिवळा रंग महत्त्वाचा मानला जातो. उदा.- स्कूल बस किंवा रस्त्यावरील चेतावणी बोर्ड हे पिवळे असतात.

**मानसशास्त्राचा दृष्टिकोन :** पिवळा रंग मेंदूला सतर्क ठेवतो. हा रंग ऊर्जा, चेतावणी आणि लक्ष देण्याचा संकेत देतो. ज्यामुळे लोको पायलट किंवा प्रवासी सहज लक्ष देतात. विविध हवामानात दिसण्याची क्षमता पिवळा रंग धुक्यात, पावसात, सायंकाळी किंवा रात्रीही इतर रंगांच्या तुलनेत स्पष्ट दिसतो. यामुळे रेल्वेची सुरक्षितता वाढते.

**इतिहास आणि अभ्यास :** पूर्वी रेल्वे व्यवस्थापनाने विविध रंग वापरले होते. मात्र अभ्यास आणि सुरक्षा या कारणांमुळे पिवळा रंग स्थिर करण्यात आला. ही रंगसंगती केवळ परंपरा नव्हे, तर विज्ञान आणि सुरक्षिततेवर आधारित आहे. पुढच्या प्रवासात हे बोर्ड पाहताना हे कारण आठवेल.

# हास्याचा अष्टपैलू चेहरा : असरानी



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदी चित्रपटसृष्टीत विनोदाचा एक खास ठसा उमटविणारे ज्येष्ठ अभिनेते स्व. गोवर्धन असरानी यांचे योगदान अविस्मरणीय आहे. तब्बल पाच दशके सिनेसृष्टीत सक्रिय राहिलेल्या स्व. असरानी यांनी ३५० पेक्षा अधिक हिंदी चित्रपटांत काम केले. त्यांच्या सहजसुंदर अभिनयशैलीने प्रेक्षकांना खळखळून हसवले आहे.
राजस्थानमध्ये जन्मलेले आणि पुण्याच्या फिल्म इन्स्टिट्यूटमध्ये अभिनयाचे शिक्षण घेतलेले असरानी यांनी १९७० च्या दशकात आपल्या करिअरची चुणूक दाखवायला सुरूवात केली. ' शोले 'मधील तुरुंगाधिकारी, ' चुपके चुपके ', ' गोलमाल ', ' आंगन के फूल 'सारख्या चित्रपटांतील त्यांचे विनोदी अभिनय आजही प्रेक्षकांच्या मनात घर करून आहेत.
असरानी यांचे खास वैशिष्ट्य म्हणजे त्यांची स्वाभाविक टाइमिंग, हावभावांतील वैविध्य आणि संवादफेकतील सहजता. त्यांनी केवळ विनोदी भूमिका नव्हे, तर काही वेळा गंभीर आणि चरित्रभूमिकाही समर्थपणे साकारल्या.
चित्रपटांच्या पलीकडे, असरानी यांनी काही काळ दिग्दर्शन आणि पटकथा लेखनातही हात आजमावला. त्यांचे योगदान केवळ हास्यनिर्मितीपुरते मर्यादित राहिले नाही, तर ते हिंदी चित्रपटसृष्टीतील बहुआयामी कलाकार म्हणून ओळखले गेले.
आजही त्यांच्या भूमिका नव्या पिढीच्या कलाकारांसाठी प्रेरणादायी ठरतात. अभिनय क्षेत्रात दीर्घकाळ योगदान देणारे असरानी हे भारतीय चित्रपटसृष्टीतील एक अनमोल रत्न होते.
अशा या बहुआयामी व्यक्तिमत्त्व असलेल्या कलाकारास भावपूर्ण श्रद्धांजली.

# पनीर अस्सल की भेसळयुक्त? कसे ओळखाल?



सणासुदीच्या दिवसांमध्ये घराघरांमध्ये चमचमीत पदार्थ बनतात. त्यात पनीरला मानाचे स्थान मिळते. मात्र यामध्ये होणारी भेसळ विसरून चालणार नाही. भेसळयुक्त पनीर सर्रास बाजारात मिळते आणि त्याला अनालॉग पनीर म्हणूनही ओळखले जाते. बनावट पनीर घरच्या घरीसुद्धा सोप्या चाचण्यांनी ओळखता येते. खाली काही सोप्या पद्धती सांगितल्या आहेत.

**१) बोटांनी चिरडून पाहण्याची चाचणी :** एक लहानसा तुकडा पनीर बोटांनी चिरडून पाहा. अस्सल पनीर नरम, मऊसूत आणि सहज तुटणारा असतो. भेसळयुक्त पनीर हातांना खवखवदार किंवा खोडरसारखा भासतो.

**२) फायर टेस्ट (आगीची चाचणी) :** पनीरचा लहानसा तुकडा गॅसवर मंद आचेवर (थेट आचेवर) ठेवा. अस्सल पनीर लगेच वितळते, पाणी सोडते आणि त्यातून दुधासारखा गंध येतो. भेसळयुक्त पनीरमधून केरोसीनसारखी दुर्गंधी येते.

**३) पॅन हीट टेस्ट (कढईत गरम करण्याची चाचणी) :** एका कोरड्या पॅनमध्ये तेल किंवा पाण्याशिवाय पनीरचा तुकडा गरम करा. अस्सल पनीर सहज पाणी सोडते, काहीसे आकुंचन पावते, पिवळसर पडते. मात्र त्याचा आकार कायम राहतो. भेसळयुक्त पनीर गरम केल्यास तुटण्यास सुरूवात होते, करपतो आणि वितळत नाही.

**४) आयोडिन टेस्ट (आयोडिन चाचणी) :** मेडिकल स्टोअरमध्ये मिळणाऱ्या आयोडिन टिंचरच्या २-३ थेंबांना पनीरवर टाका. अस्सल पनीरचा रंग बदलत नाही. भेसळयुक्त पनीरमध्ये स्टार्च असल्यास तो निळा किंवा काळा पडतो. (लक्षात घ्या : ही चाचणी स्टार्चची भेसळ ओळखते.)

**५) लिंबाचा रस टाकून चाचणी :** पनीरवर लिंबाचा रस टाका. अस्सल पनीर फक्त आंबट होते. भेसळयुक्त पनीर आकुंचन पावतो किंवा विकृत होतो. **सल्ला : नेहमी विश्वासू दुकानातून पनीर खरेदी करा. शक्य असल्यास घरीच बनवा. भेसळयुक्त पनीर आरोग्यास हानिकारक ठरू शकते म्हणून सावध राहा.**

# एक ताने ने बदली डॉ. प्रियंका शुक्ल की ज़िंदगी, डॉक्टर से बनीं आयएएस अधिकारी



**सक्सेस स्टोरी**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कभी-कभी ज़िंदगी में एक छोटी-सी घटना या बात इंसान की पूरी दिशा बदल देती है। एक साधारण-सा ताना भी किसी के भीतर इतना बड़ा तूफान ला सकता है कि वह अपने कम्फर्ट ज़ोन से बाहर निकलकर कुछ असाधारण करने की ठान ले। ऐसी ही है आयएएस अधिकारी डॉ. प्रियंका शुक्ला की प्रेरक कहानी, जिनके जीवन का रास्ता एक सवाल ने बदल दिया।

**डॉक्टर से आयएएस तक का सफर**
प्रियंका शुक्ला एक मेधावी छात्रा थीं, जिनका बचपन से सपना था डॉक्टर बनना। उन्होंने लखनऊ के प्रतिष्ठित किंग जॉर्ज मेडिकल यूनिवर्सिटी से एमबीबीएस की डिग्री हासिल की और चिकित्सा क्षेत्र में कदम रखा। लेकिन एक घटना ने उनके जीवन को नई दिशा दे दी। अपनी इंटर्नशिप के दौरान वह एक बार स्लम क्षेत्र में मेडिकल चेकअप के लिए गईं। वहां उन्होंने देखा कि एक महिला गंदा पानी पी रही थी और अपने बच्चों को भी वही पानी दे रही थी। जब प्रियंका ने उससे इसका कारण पूछा, तो महिला ने तंज भरे लहजे में जवाब दिया, "क्या तुम कहीं की कलेक्टर हो?"
यह सवाल भले ही एक ताने के रूप में आया, लेकिन प्रियंका के लिए यह एक ज़िंदगी बदलने वाला क्षण था। उन्होंने महसूस किया कि समाज की समस्याओं का समाधान केवल दवाइयों से नहीं, बल्कि नीतियों और प्रभावी प्रशासन से भी हो सकता है। उसी पल उन्होंने ठान लिया कि वह कलेक्टर बनेंगी और समाज में सकारात्मक बदलाव लाएंगी।

**यूपीएससी की तैयारी और सफलता**

**प्रियंका ने २००६ में यूपीएससी सिविल सेवा परीक्षा की तैयारी शुरू की। उनका पहला प्रयास असफल रहा, लेकिन उन्होंने हिम्मत नहीं हारी। अपनी कड़ी मेहनत, लगन और दृढ़ संकल्प के बल पर उन्होंने २००९ में यूपीएससी परीक्षा पास की और आयएएस अधिकारी बन गईं। डॉ. प्रियंका शुक्ला की कहानी एक प्रेरणा है कि कैसे एक छोटा-सा ताना जीवन का लक्ष्य बदल सकता है। एक डॉक्टर से आयएएस अधिकारी बनने तक का उनका सफर दर्शाता है कि दृढ़ इच्छाशक्ति और मेहनत से कोई भी मंज़िल हासिल की जा सकती है। उनकी कहानी हमें सिखाती है कि समाज की बेहतरी के लिए सिर्फ इरादे और कदम उठाने की जरूरत होती है।**

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# दररोज दोन हजार शेतकऱ्यांचा शेतीला रामराम

## शतकाच्या अखेरीस शेतजमीन होईल निम्मी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



दिवसेंदिवस आतबट्ट्याची होत चालल्याने शेतकऱ्यांनी शेतजमिनी कसणे सोडून त्यांची विक्री करण्याचा सपाटाच लावला आहे. गावोगावी अशा शेतजमिनी विक्रीला आहेत. हा ट्रेंड अगदी दूरच्या गावखेड्यापासून जिल्ह्यासारख्या ठिकाणीही वेगाने पसरत आहे. ही परिस्थिती फक्त भारतातच नव्हे, तर अनेक देशांत आहे. जगभरात शेतजमीन कमी होत आहे, तर दुसरीकडे शेती करणाऱ्यांचे वय वाढत आहे.

सध्या जागतिक स्तरावर शेतकऱ्यांचे सरासरी वय ५५ वर्षे आहे. जे काम करणाऱ्या लोकसंख्येच्या निवृत्तीच्या वयाच्या जवळ आहे. त्याचवेळी तरुणांचा शेतीला व्यवसाय म्हणून बघण्यात रस कमी झाला आहे. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या (आयएलओ) आकडेवारीनुसार १९९१ मध्ये जागतिक रोजगारात कृषी क्षेत्राचा वाटा अंदाजे ४३ टक्के होता. २०२३ पर्यंत हा आकडा २६ टक्क्यांपर्यंत कमी झाला. भारताच्या २०११ च्या जनगणनेनुसार दररोज सरासरी सुमारे २००० शेतकरी शेती कसणे थांबवत आहेत.

शेती ही एक आधारभूत आर्थिक क्रिया आहे. शेतीचा थेट संबंध हवामानाशी आहे. हवामान बदलामुळे पीकचक्र विस्कळीत झाल्याचे दिसते. सध्या आपल्याकडे शेतीसाठी पुरेशी जमीन आहे का? की या संकटाच्या केंद्रस्थानी जमिनीची वाढत्या अन्न मागणीची पूर्तता करण्यासाठी आपल्याला अधिक शेतजमिनीची आवश्यकता आहे? सध्या पृथ्वीचा अंदाजे एकतृतीयांश भाग शेतीसाठी वापरला जातो. हा विस्तार हजारो वर्षांपासून झाला आहे. स्थलांतराचा परिणाम अमेरिकेतील कोलोरॅडो विद्यापीठातील बेटर प्लॅनेट लॅबोरेटरीचे झिया मेहराबी यांनी या दिशेने पहिलीच गणना केली आहे. त्यांनी १९६० ते २१०० पर्यंत दरवर्षी शेतांची संख्या आणि आकाराचा अंदाज लावला. देशाची अर्थव्यवस्था वाढत जाईल तसतसे लोक शहरांमध्ये स्थलांतरित होतील. ज्यामुळे ग्रामीण भागात शेती करण्यासाठी कमी लोक राहतील. उच्च आणि निम्न मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये शतकाच्या अखेरीपर्यंत ही घट सुरू राहील. कमी उत्पन्न असलेल्या देशांमध्ये २०७० पर्यंत शेतांची संख्या वाढेल. त्यानंतर ती कमी होण्यास सुरूवात होईल. हे आपल्या अन्नसुरक्षेला धोका निर्माण करते का? मेहराबी उत्तर देतात, की सध्या आपल्याकडे जगातील ८ अब्ज लोकसंख्येला अन्न पुरविणारी शेती आहे, असे म्हटले.

*विज्ञान आउटरीचच्या प्रमुख हन्ना रिची यांनी जागतिक शेतजमिनीवरील डेटाचे विश्लेषण केले आहे. त्या म्हणतात, की शेतजमिनीचा हा विस्तार आता संपला आहे. आपण हजारो वर्षांत उच्चांक गाठला आहे. अलीकडच्या वर्षांत जागतिक शेतजमिनीचा वापर कमी होऊ लागला आहे. अशा परिस्थितीत जागतिक शेतीचे भविष्य काय असेल? याचा भविष्याबद्दलचा ठोस डेटा उपलब्ध नाही. तरुणाईची पाठ लोकसंख्यावाढीमुळे अन्नाची मागणी वाढत असताना, शेतीला सुद्धा मर्यादा येतात. शेतीत सातत्याने काम करावे लागते. हे काम आजची तरुण पिढी स्वीकारण्यास तयार नाही. याचा अर्थ असा की, आपल्या अन्न उत्पादनासाठी महत्त्वाच्या या व्यवसायाला अभूतपूर्व आव्हानांचा सामना करावा लागत आहे.*

# संतोष खांडेकर यांचा जामीन फेटाळला

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



जालना महापालिकेचे प्रशासक संतोष खांडेकर यांचा जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळला आहे. दहा लाख रुपयांची लाच स्वीकारताना ते लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या सापळ्यात अडकले होते. त्यांना न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने त्यांना पोलीस कोठडी सुनावणी होती. आरोपी पोलीस अधिकारी असल्याने पुरावे नष्ट करण्याची शक्यता तपास अधिकाऱ्यांनी व्यक्त केली. दरम्यान, त्यांना अटक झाल्यावर नागरिकांनी जल्लोष साजरा केला होता.

संतोष खांडेकर यांना १० लाख रुपयांची लाच घेताना मुद्देमालासह पकडण्यात आले. कंत्राटदाराचे बिल काढण्यासाठी त्यांनी २० लाख रुपयांची मागणी केली होती. विशेष न्यायालयाने त्यांचा जामीन अर्ज फेटाळला आहे. खांडेकर हे पूर्वी पोलीस अधिकारी असल्याने पुरावे नष्ट करण्याची किंवा साक्षीदारांवर दबाव टाकण्याची शक्यता तपास अधिकारी शरदचंद्र रोडगे यांनी न्यायालयात व्यक्त केली आहे. या प्रकरणात सहाय्यक जिल्हा सरकारी वकील अ‍ॅड. वाल्मीक घुगे आणि तपास अधिकारी रोडगे यांनी सरकारतर्फे बाजू मांडली. त्यांना अ‍ॅड. अनिरुद्ध घुले-पाटील, अ‍ॅड. सलमान खान, अ‍ॅड. रमेश गाढे, अ‍ॅड. श्वेता सेठीया, अ‍ॅड. संजय कांबळे यांनी सहकार्य केले.

# यंदाच्या दिवाळीला 'या' ३ गोष्टी करा दान!

## सदैव राहील माता लक्ष्मीचा आशीर्वाद

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दिवाळी हा प्रकाश आणि आनंदाचा सण आहे. हिंदू धर्मानुसार पूजा आणि प्रार्थनेसोबतच दान करण्यालाही विशेष महत्त्व आहे. दरवर्षी कार्तिक अमावास्येला दिवाळी साजरी केली जाते. यावर्षी दिवाळी २० ऑक्टोबर रोजी साजरी केली जात आहे. धार्मिक आणि आध्यात्मिक दृष्टिकोनातून दिवाळी हा एक अतिशय खास दिवस मानला जातो. या दिवशी काही विशिष्ट वस्तू दान केल्याने सकारात्मक ऊर्जा आणि आनंद तसेच समृद्धीचा लाभ होतो. याव्यतिरिक्त माता लक्ष्मी यांच्या आशीर्वादाने आर्थिक स्थिरता प्राप्त होते. तेव्हा दिवाळीत नेमक्या कोणत्या वस्तू दान करणे शुभ मानले जाते.

**अन्नदान :** हिंदू धर्मात अन्नदानाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. हे सर्वात श्रेष्ठ दान मानले जाते. अनेक धर्मस्थळी अन्नदान करता येते. अन्नदान केल्याने माता लक्ष्मी तसेच देवी अन्नपूर्णा प्रसन्न होते, असे मानले जाते. दिवाळीच्या दिवशी गरीब आणि गरजूंना अन्नदान करावे.

**कपडे दान करणे :** हिंदू धर्मात कपडे दान करणे अत्यंत शुभ मानले जाते. हातावर पोट असलेल्यांना, योग्य निवारा नसलेल्यांना किवा अत्यंत हलाखीत दिवस काढणाऱ्यांना अशावेळी कपडे दान करावेत. कपडे दान केल्याने देवी लक्ष्मी प्रसन्न होते आणि अर्थिक समस्यांपासून मुक्तता मिळते असे मानले जाते.

**शृंगाराचे सामान :** दिवाळीच्या दिवसांत विवाहित महिलांना सौंदर्याचे म्हणजेच शृंगाराचे सामान दान करणे अत्यंत शुभ मानले जाते. शृंगाराच्या सामानाचे दान केल्याने देवी लक्ष्मी प्रसन्न होते आणि त्यांना शाश्वत सौभाग्य मिळते, असे मानले जाते. दिवाळीत कोणत्या गोष्टी दान करू नये? दिवाळीत चुकूनही साखर दान करू नये. साखर ही ऊसापासून तयार केली जाते. ऊस हा देवी लक्ष्मीला प्रिय आहे. म्हणूनच साखर दान केल्याने देवी लक्ष्मी तुमच्या घरातील निवास सोडू शकते. शिवाय दिवाळीत दूध, दही, सुया आणि मीठ दान करणे देखील टाळले पाहिजे.



# शेतकऱ्यांना अतिवृष्टीची नुकसान भरपाई द्या..!

## माजी आमदार शिरीषदादा चौधरींचे पालकमंत्र्यांना निवेदन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अतिवृष्टीमुळे अमळनेर तालुक्यातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. शनिवार, दि. १८ ऑक्टोबर रोजी शासनने जाहीर केलेल्या अतिवृष्टी यादीत अमळनेर तालुक्याचा समावेश झालेला नाही. शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी मागणी माजी आमदार शिरीषदादा चौधरी यांनी केली आहे. याबाबत त्यांनी पालकमंत्री गुलाबराव पाटील यांना निवेदन दिले आहे.

निवेदनात म्हटले आहे, की अमळनेर तालुक्यातील शेतकऱ्यांचे अतिवृष्टी आणि पुरामुळे मोठे नुकसान झाले. भरपाईसाठी वेळोवेळी शासनाकडे मागणी करण्यात आली होती. जाहीर करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार जिल्ह्यातील ३, २५, ३५९ शेतकऱ्यांना २, ४७, २६२. ०१ हेक्टर क्षेत्रासाठी एकूण २९९९४. ४७ लाखांची मदत घोषित करण्यात आली. मात्र, यात अमळनेर तालुक्याचा समावेश नाही. या निर्णयामुळे अमळनेर तालुक्यातील शेतकरी शासनाच्या मदतीपासून वंचित आहेत. सुधारित शासन निर्णय निर्गमित करून अमळनेर तालुक्याचा समावेश करावा. शेतकऱ्यांना मदत मिळवून द्यावी, असेही निवेदनात म्हटले आहे. याप्रसंगी शिवसेनेचे तालुकाप्रमुख सुरेश पाटील, किशोर पाटील, रोशन सोनवणे, माजी नगरसेवक अनिल महाजन आदी उपस्थित होते.

# पिंपळे खुर्द येथून बैलजोडी, गाय चोरीस

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर तालुक्यातील पिंपळै खुर्द येथून बैलजोडी व एक गाय चोरीस गेली आहे. ही घटना शनिवार, दि. १८ रोजी मध्यरात्री घडली. सुकदेव अर्जुन पाटील यांच्या मालकीची बैलजोडी, तर सुकदेव बाबूराव पाटील यांची गाय होती. जवखेडा येथे दत्त मंदिर परिसरात सीसीटीव्ही कॅमेरा लावण्यात आलेले आहेत. या सीसीटीव्ही कॅमेरात बैलजोडी घेऊन जाणारे चोर दिसून येत आहेत. याप्रकरणी अमळनेर पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद झाली आहे. हवालदार कैलास शिंदे तपासकरीत आहेत.




# पिंपळे रस्त्यावरील वस्तीत लायन्स क्लबतर्फे फराळ वाटप

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दिवाळी म्हणजे आनंद, प्रकाश आणि प्रेमाचा सण. मात्र, समाजातील काही कुटुंबांपर्यंत अजूनही या प्रकाशाचा उजेड पोहोचलेला नाही. या पार्श्वभूमीवर लायन्स क्लबने वंचितांना फराळ वाटप केला. त्यांचा आनंद द्विगुणित केला. रविवार, दि. १९ ऑक्टोबर रोजी पिंपळे रोडवरील शासकीय आयटीआय जवळील वस्तीत हा फराळ वाटपाचा कार्यक्रम झाला. लायन्स क्लबचे सुनील चौधरी यांनी त्यांच्या पत्नी स्व. भाग्यश्री चौधरी यांच्या प्रथम स्मृतीप्रित्यर्थ योगदान दिले. येझदी भरुचा यांनी या उपक्रमास आर्थिक सहकार्य केले. लायन्स क्लबचे अध्यक्ष डॉ. संदीप जोशी, सचिव महेंद्र पाटील, खजिनदार नितीन विनचुरकर, प्रोजेक्ट चेअरमन चेतन जैन व प्रशांत सिंघवी, लायनेस क्लबच्या अध्यक्षा डॉ. मयुरी जोशी, योगेश मुंदडा, शेखर धनगर, प्रदीप जैन, विनोद अग्रवाल, महेश पवार, सुशील जैन, राजेश नांढा, दिलीप गांधी, पंकज मुंदडा, दिनेश मणियार, शामशेठ गोकलानी, अनिल रायसोनी, प्रा. जयेश गुजराथी, हरिओम सोनी, प्रितेश पारख आदी उपस्थित होते. गरीब मुलांना व महिलांना फराळ, मिठाई आणि गिफ्ट्सचे वाटप करण्यात आले.

# बेशिस्त वाहनधारकांवर पोलिसांची कारवाई

**अमळनेर :** दगडी दरवाजा ते तिरंगा चौकापर्यंत वाहतुकीचा खोळंबा होत आहे. बेशिस्त पार्किंगमुळे ही समस्या अधिक गंभीर बनली होती. ही वाहतूक सुरळीत करण्यासाठी वाहतूक शाखेच्या पोलिसांनी मंगळवार, दि. २१ रोजी आठ ते दहा वाहनधारकांवर दंडात्मक कारवाई केली आहे. रस्त्यावर बेशिस्तीने लावण्यात आलेली चारचाकी व दुचाकी वाहने हटविण्यात आली आहेत. यामुळे काही अंशी का होईना वाहतूक सुरळीत झाली आहे. मात्र, या परिसरात मुख्य बाजारपेठा असल्याने नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. वाहतूक शाखेच्या पोलिसांची दगडी दरवाजा परिसरात कायम नेमणूक करण्यात यावी. बेशिस्त वाहनधारकांवरील कारवाई केवळ दिवाळीपुरतीच नको, तर कायमस्वरूपी राहावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# पंधरा वर्षे दिवाळीला कुटुंबाचा दुरावा

**पान १ वरून**

कर्मचाऱ्यांसाठी अंघोळीचे गरम पाणी, सुगंधी उटणे, सुवासिक साबण देतात. लक्ष्मीपूजनाच्या दिनी लक्ष्मीचा फोटो आणणे, हार घालणे, पूजापाठ करणे सुरू असते. तसेच फराळाची देवाणघेवाण केली जाते. कमी आवाजाचे फटाके फोडून दिवाळीचा जल्लोष कर्मचाऱ्यांसोबत साजरा केला जातो. काही सेवानिवृत्त कर्मचारी एसटी आगारात येऊन कर्मचाऱ्यांसह दिवाळी साजरा करतात. स्थानिक कर्मचारी मुक्कामी आलेल्या कर्मचाऱ्यांची खूप चांगली सेवा करतात, काळजी घेतात. मग काही कर्मचारी आपले मनोगत व्यक्त करतात. यावेळी अनेकांना कुटुंबीयांची आठवण येऊन भरून येते, असे कराड यांनी सांगितले.

दिवाळी ही साधारण एका आठवड्याची असते. परंतु एसटी कर्मचाऱ्यांसाठी दिवाळीनिमित्त साधारणपणे तीन आठवडे काम करावे लागते. दिवाळी येण्याच्या आधीच्या आठवड्यात आणि दिवाळीच्या आठवड्यात प्रवाशांना त्यांच्या मूळ गावी सोडण्याचे काम केले जाते. तर दिवाळीनंतरच्या आठवड्यात पुन्हा गावावरून शहरात प्रवाशांना सोडावे लागते. त्यामुळे तीन आठवडे कुटुंबीयापासून दुरावा राहतो. प्रवाशांना सुरक्षित आणि सुखदायक प्रवास झाल्यानंतर घरी जाऊन दिवाळी संपल्यानंतर एसटी कर्मचारी दिवाळी साजरा करतो, असे कराड यांनी सांगितले.

कराड यांच्या पाथर्डी या गावी आई-वडील, आजी-आजोबा, पत्नी, दोन मुलगे, भाऊ, भावाची पत्नी आणि त्यांची दोन मुले असा परिवार आहे. आता कराड यांची मुले मोठी झाली आहेत. पण मुले लहान असताना दिवाळीत कामावर न जाण्याचा हट्ट करायची. त्यांचा बालहट्ट पूर्ण करू शकलो नाही. एसटीचे प्रवासी हेच आमचे कुटुंब मानून प्रत्येक बहीण-भावाचा प्रवास सुरक्षित होण्यासाठी त्यांना योग्यरित्या घरी सोडवायचे काम केले आहे, अशी भावना कराड यांनी व्यक्त केली.







अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

बातमीसाठी संपर्क :
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

जाहिरातीसाठी संपर्क :
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234




जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १) | पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) | अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) | पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) | 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) | 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) | 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) | ३ वर्षाखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) | शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) | लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) | उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

जाहिरात बुकिंगसाठी संपर्क
शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234
वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.




# पाडवा, भाऊबीज नवविवाहितांसाठी महत्त्वपूर्ण...!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



दरवर्षी आपल्या समाजसंस्कृतीत उत्सवाचा हा प्रवाह विशेष महत्त्वाचा असतो. विशेष करून पाडवा आणि भाऊबीज हे दोन दिवस नुसतेच धार्मिक अनुष्ठाने नाहीत, तर सामाजिक बंधांचे, कुटुंबीनात्यांचे, आणि नवीन सुरूवातीचे प्रतीक आहे.

**पडवा म्हणजे काय?**

महाराष्ट्रात ' पाडवा ' म्हणून ओळखला जाणारा हा दिवस प्रमुख म्हणजे कार्तिक शुद्ध प्रतिपदायाला बलिप्रतिपदा असेही म्हणतात.

या दिवशी नवविवाहित जोडप्यांसाठी ' पहिली दिवाळी ' मानली जाते, पत्नी आपल्या पतीच्या घरी जावयास (माहेराहून) जातात.

पारंपरिक विधीमध्ये पतीपत्नी एकमेकांचे औक्षण करतात (पत्नी पतीचे, काही भागात त्याच्या पत्नीचे) आणि घरात आनंद व समृद्धीची प्रार्थना होते. शिवाय काही भागांत हा दिवस व्यापाऱ्यांसाठी नववर्षासारखा समजला जातो. व्यवसाय नव्याने सुरू करणे, नवे खाते उघडणे, अशी प्रथा आहे.

**माहिती व सामाजिक दृष्टीने महत्त्व**

पाडवा नवप्रारंभाचे प्रतीक आहे. जुनी गोष्ट संपली. नवीन सुरूवात झाली. हे जीवनातील बदल, नवविवाहितांचे जीवन, कुटुंबातील नवीन अवस्था यांचा चिन्ह आहे.

आर्थिक आणि सामाजिक दृष्टीने हा दिवस महत्त्वाचा ठरतो. कारण नवविवाहित जोडप्यांकडे पारंपरिक भेटवस्तू, घरसज्जा, अन्नयोजना अशा अनेक खर्चांचा भाग असतो.

या दिवशी कुटुंबातील माहेरसासरचे नाते अधिक दृढ होते; सामाजिकदृष्ट्या बंध मजबूत होतात.

धार्मिकदृष्ट्या हिंदू पंचांगानुसार प्रतिपदा ही शुभ वेळ आहे. त्या अनुषंगाने शुभ मुहूर्त देखील ठरतो.

**भाऊबीज म्हणजे काय ?**

भावाबहिणीच्या नात्याचा उत्सव म्हणजे भाऊबीज. भाऊबीज हा दिवस बहीण आणि भाव यांच्यातील प्रेम व वचनबद्धतेचा उत्सव आहे. बहीण आपल्या भावाच्या आयुष्यासाठी प्रार्थना करते, त्याला गोडधोड खाऊ घालते, त्याचे औक्षण करते; भाऊ बहिणीला भेटवस्तू देतो.

या दिवशी कुटुंबात विविध पारंपरिक कार्यक्रम होतात. रांगोळी, दिवे, फराळ, ओवाळणी यांचा त्यात समावेश असतो.

या सणाला वेगवेगळ्या राज्यांमध्ये विविध नावे आहेत. उदा.- नेपाळमध्ये ' भाई टिका ', पश्चिम बंगालमध्ये ' भाई फोटा ' अशी नावेत.

**दोन्ही सणांचा संयोजन आणि अभ्यास**

पाडवा आणि भाऊबीज हे दिवस सलग येतात. आपल्या दिवाळीचे भाग आहेत. त्यामुळे घराघरांत दिवाळीच्या आधी किंवा नंतर या दिवसांची तयारी सुरू होते.

या सणांमुळे समाजातील विविध परंपरा आर्थिक, सामाजिक, धार्मिक एकत्र येतात. घरातील महिलांनी फराळ व रांगोळी, सजावट केली तर पुरुषांनी भेटवस्तू व भेट यांची तयारी केली.

नवीन वर्षाची सुरूवात असो वा बहीणभावाचा बंध असो. या उत्सवांनी कुटुंब व समाजात आनंद, संवाद व समृद्धीची हवा निर्माण केली आहे.

पत्रकारितेच्या दृष्टीने पाहता, हे सण स्थानिक अर्थव्यवस्था, खरेदीविक्री, भेटवस्तूंचा बाजार, सामाजिक कार्यक्रम यांच्याशी देखील जोडलेले आहेत. लेखात या पैलूंना देखील स्थान देता येईल.

### माहिती व सामाजिक दृष्टीने महत्त्व

सामाजिकदृष्ट्या भावाबहिणीचे नाते हे कुटुंबाच्या आधाराचा भाग आहे. भाऊ- बहिणीचे रक्षण करण्याचे वचन देतो, की बहीण भावाच्या यशआयुष्याची कामना करते. हे नाते फक्त कौटुंबिक नव्हें, तर सामाजिक बंध तयार करणारे आहे.भविष्यातील कुटुंबपरंपरा, संस्कृती व मर्यादा या सणाद्वारे पुढे मिळतात. आधुनिक काळात जिथे नाते जड झालेले दिसतात, तिथे हा दिवस संवाद साधण्याचा, भाऊबहिणीने एकमेकांकडे वेळ देण्याचा, भेट देण्याचा एक चांगला अवसर ठरतो.हे देखील लक्षात घ्यावे, की सणापूर्वीचे ताणतणाव, कामाच्या गतीमुळे नाते दुर्लक्षित होऊन जात आहेत; त्यामुळे या दिवसांनी त्या ताणांचा विराम मिळतो.



# दिवाळी पूजनातील आठ शुभ प्रतीके

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दिवाळीच्या शुभप्रसंगी माता लक्ष्मीपूजनाचे विधान आहे. या दिवशी घर आणि देवघर सजविण्यासाठी मंगळ वस्तू वापरल्या जातात. जाणून घ्या गृह सुंदरता, समृद्धी आणि दिवाळी पूजनातील आठ शुभ प्रतीके.

1) **दिवा :** दिवाळी पूजनात दिव्याचे अत्यंत महत्त्व आहे. लक्ष्मी पूजनात केवळ मातीच्या दिव्यांचे महत्त्व आहे. पाच तत्त्व माती, आकाश, जल, अग्नी आणि वायू. त्यामुळे प्रत्येक विधीत पंचतत्त्वांची उपस्थिती अनिवार्य आहे. काही लोक पारंपरिक दिवे न लावता मेणबत्ती किंवा इलेक्ट्रिक दिवे लावतात, असे करणे योग्य नाही.

2) **रांगोळी :** सण- उत्सव आणि अनेक मांगलिकप्रसंगी रांगोळी काढल्याने घर-अंगण सुंदर दिसते. त्यामुळे घरात सकारात्मकता राहते. अशी सजावट समृद्धीचे दार उघडते.



3) **कवड्या :** पिवळ्या कवड्या माता लक्ष्मींचे प्रतीक मानल्या गेल्या आहेत. दिवाळीच्या दिवशी चांदी आणि तांब्याचे शिक्के यांसह कवड्या पूजन देखील महत्त्वाचे आहे. पूजनानंतर एक-एक पिवळी कवडी वेगवेगळ्या लाल कपड्यात गुंडाळून घरातील तिजोरी किंवा खिशात ठेवल्याने धन समृद्धी वाढते.

4) **तांब्याचा शिक्का :** तांब्यात सात्त्विक लहरी उत्पन्न करण्याची क्षमता इतर धातूंपेक्षा अधिक असते. कलशामध्ये असणाऱ्या लहरी वातावरण प्रवेश करतात. कलशामध्ये तांब्याचा शिक्का टाकल्याने घरात शांती आणि समृद्धीचे दार उघडतील.

5) **मंगल कलश:**जमिनीवर कुंकाने अष्टदल कमळ आकृती बनवून त्यावर कलश ठेवलेला असतो. पाण्याने भरलेल्या कांस्य, तांबा, रजत किंवा स्वर्णकलशात आंब्याचे पान टाकून त्यावर नारळ ठेवलेले असते. कलशावर कुंकू, स्वस्तिक चिन्ह आणि त्यावर लाल दोरा बांधलेला असतो.

6) **श्रीयंत्र :** धन आणि वैभवाचे प्रतीक आहे लक्ष्मी श्रीयंत्र. हे अत्यंत प्रसिद्ध व प्राचीन यंत्र आहे. श्रीयंत्र धनागमासाठी आवश्यक आहे. श्रीयंत्र यश आणि धनाची माता लक्ष्मी यांना आकर्षित करण्यासाठी शक्तिशाली यंत्र आहे. दिवाळीच्या दिवशी श्रीयंत्र पूजा करणे शुभ असते.

7) **फूल :** कमळ आणि झेंडूची फुले शांती, समृद्धी आणि मुक्तीचे प्रतीक मानले गेले आहे. पूजा व्यतिरिक्त घराच्या सजावटीसाठी झेंडूची फुले आवश्यक आहेत. घराची सुंदरता, शांती आणि समृद्धीसाठी अत्यंत आवश्यक आहे.

8) **नैवेद्य :** माता लक्ष्मी यांना नैवेद्यात फळे, मिष्टान्न, मेवे आणि पेठे या व्यतिरिक्त लाह्या, बत्ताशे, चिरंजी, शंकरपाळे, करंजी व इतर फराळांचा नैवेद्य लावावा. हे गोड पदार्थ आमच्या जीवनात गोडवा घोळतात.

# दिवाळीचा फराळ करू नका, पण त्याची टिंगलही करू नका !

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अभ्यंगस्नानानंतर सर्व कुटुंबीयांनी एकत्र बसून दीपावलीच्या सणानिमित्त आणि आनंदाप्रीत्यर्थ फराळ करणे ही आपली पिढ्यानपिढ्यांची परंपरा आहे. नंतरही दिवाळीच्या सर्व दिवशी हा प्रघात सुरूच राहतो. करंजी, लाडू, अनारसा, चिरोटे, शंकरपाळे, चकली, शेव, कडबोळी, चिवडा अशा अनेक पारंपरिक पदार्थांची मांदियाळी समोर येते. या सर्व पदार्थांचा आस्वाद घेतल्यानंतर दही पोहे खाऊन या फराळ कार्यक्रमाची सांगता होत असे.

या कार्यक्रमानिमित्त घरातील सगळ्या नातेवाईकांनी एकत्रित बसून हास्यविनोद करणे, अनेक घरांत यानिमित्त आलेला एखादा पाहुणा, आधींच्या फराळाच्या आठवणी असा एक गोफ विणला जात असे. घरात फराळ करण्याआधी मंदिरात जाऊन देवाला फराळाचे पदार्थ, नैवेद्य म्हणून अर्पण केले जातात. एखाद्या नातेवाईकाचे, मित्राचे कुणी मागच्या वर्षात निधन झाले असेल, तर त्याच्या घरी सर्वांत आधी फराळाचे पदार्थ पाठविण्याची पद्धत आजही पाळली जाते. समाजातील अनाथाश्रम, वृद्धाश्रम, रुग्णालये, सीमेवर लढणारे सैनिक यांना अत्यंत आठवणीने फराळाचे पदार्थ पाठविण्याची प्रथा लाखो लोक पाळतात. भारतातून दरवर्षी विदेशामध्ये टनावारी फराळाचे पदार्थ पाठविले जातात.

फक्त दिवाळीलाच केले जाणारे हे सर्व पदार्थ, हळूहळू बदलणाऱ्या काळानुसार वर्षभर, मुबलक आणि अनेक प्रकारांमध्ये सहज मिळू लागले. खास दिवाळीचे पदार्थ ही त्याची ओळख आणि प्रसिद्धी पुसट होत गेली. पण त्याचा दुष्परिणामही असा झाला, की दिवाळीला हे पदार्थ खाणे म्हणजे जुनाट बुरसटलेली कल्पना आहे, असेच हळूहळू वाटू लागले. या पदार्थांचा तिरस्कार करणे, ते खाणाऱ्यांना कमी लेखणे, त्यांची थट्टा करणे अशा गोष्टी सुरू झाल्या. चारचौघे



भेटले, की जाहीरपणे आम्ही हल्ली फराळाचे काही करीतच नाही, हे अगदी घोटवून, रंगवून सांगितले जाते. त्या चकल्या, करंज्या खाण्याऐवजी आम्ही चक्क पावभाजी करतो. पाणीपुरी करतो, गोड -गोड अगदी नको वाटते. अशा गोष्टी रंगविल्या जातात. गोडाला आपण अति नाके मुरडल्यामुळे, अनेकांना मधुमेहामुळे, खरोखर गोड खाणे अशक्य झाले आहे. परंतु त्याचवेळी अनेक मोठमोठ्या नटांनी केलेल्या जाहिरातीतील 'कुछ मिठा हो जाये' ही चॉकलेट्स आपल्याला चालतात हे आश्चर्यच म्हणायचे. किती वर्षे तेच- तेच लाडू, चकल्या, करंज्या खायचे, अशी आपल्या फराळ संस्कृतीची सातत्याने टिंगल करणारी माणसे. मात्र आपला मुस्लीम शेजारी शीरखुर्मा किती छान बनवतो आणि आपल्याला आणून देतो, याचे कौतुक करतात. एखादा ख्रिश्चन मित्र ख्रिसमसला किती छान केक पाठवतो याचेही वर्णन ऐकायला मिळते. त्यांना केक किंवा शीरखुर्मा ऐवजी चॉकलेट खा, असे सांगण्याचे कुणाच्यातही धैर्य नाही.

सर्वांत महत्त्वाचे म्हणजे कुणीही ख्रिश्चन माणूस किती वर्षे तोच तोच केक खायचा असे म्हणत नाही. कुणीही मुस्लीम माणूस किती वर्षे तोच- तोच शीरखुर्मा खाणार, असे म्हणत नाही किंवा त्या ऐवजी शेजारी-पाजारी पावभाजी, पाणीपुरी, रगडा पॅटीस नेऊन देत नाही. ते त्यांचीच संस्कृती पाळतात आणि आपण त्याबद्दल त्यांचे कौतुकही करतो. मग आपण आपल्या इतक्या पिढ्यांच्या परंपरेची टिंगल टवाळी का करतो?

जशा चकल्या, करंज्या, चिवडा, लाडू या गोष्टी वर्षभर उपलब्ध असतात, तशाच पावभाजी, पाणीपुरी, रगडा पॅटीस वर्षभर उपलब्ध असतेच ना. एकत्रित फराळ करणे ही आपली कित्येक पिढ्यांची परंपरा आहे. यात आपल्या धर्माच्या, संस्कृतीच्या, सामाजिक संबंधांच्या अनेक छटा दडलेल्या आहेत. अनेक गरीब महिला आणि संस्था यांना प्रचंड रोजगार उत्पन्न होतो. माझी नम्र विनंती आहे, की तुम्हाला खरोखरच कंटाळा आला असेल, तर फराळाचे पदार्थ बनवू नका, विकत आणू नका, खाऊ नका. पण त्याची जाहीर कुचेष्टा करणे, टर उडवणे या गोष्टी अवश्य टाळा.

### दीपावलीचा फराळ कसा असावा?


देहाच्या करंजीत
सदगुरू नामाचे सारण ठासून भरावे. विवेकाच्या कढईत अलगद तळावे. सदिच्छारूपी चकलीला भरपूर काटे असावेत.जेणे करून वासनांचे असुर दूरच राहतील. भोगाचा अनारसा नामरूपी खसखस लावून थापावा. अलगद तळावा. नामाची खसखस जितकी जास्त तितका भोगात अलिप्तपणा जास्त. चिवडा म्हणजे सभोवताली असलेला समाज. चटपटीत, तिखट चवीचा. त्यातील दाणे, डाळ, खोबऱ्याचे काप, कढीपत्ता ही सारी वेगवेगळ्या स्वभावाची माणसे. साधकाला या साऱ्यांना स्वतःमध्ये मिसळून घ्यायचे असते. मात्र तरीही स्वतःला अलिप्त ठेवायचे. सरते शेवटी लाडू. सगळे गोड करून गोड आठवणी ठेवत पुढे जायचे. या सगळ्या क्रियांमध्ये साधकाला स्वतःला तावून- सुलाखून निघावे लागणार. भाजणे, तळणे म्हणजे प्रारब्ध भोग भोगावे लागणार. शेवटी साऱ्या वासनांचा गोळा करून लाडू रूपाने त्या प्रत्यक्ष परमेश्वर सदगुरूंना अर्पण करून देहाचा नैवेद्य दाखवून टाकायचा.

# भाऊबीज : नात्यातील निखळ प्रेमाचा उत्सव

भाऊबीज हा दिवाळीतील शेवटचा आणि अतिशय हृदयस्पर्शी सण. या दिवशी बहीण आपल्या भावाला ओवाळते, त्याच्या दीर्घायुष्याची आणि यशस्वी जीवनाची प्रार्थना करते. तर भाऊ तिला प्रेमाची, सुरक्षिततेची आणि आधाराची हमी देतो. हा फक्त ओवाळणीचा नव्हे, तर नात्यातील एकमेकांविषयी असलेल्या आपुलकीचा, काळजीचा आणि समर्पणाचा उत्सव आहे. भाऊबहिणीचे नाते हे फारच वैशिष्ट्यपूर्ण असते. लहानपणापासून भांडणे, खेळ, गोड तक्रारी, एकमेकांची साथ, हे सर्व अनुभवत मोठे झालेले हे नाते, वयाच्या प्रत्येक टप्प्यावर वेगवेगळ्या स्वरूपात उमलत जाते. लहानपणी भाऊ बहिणीच्या गोड लाडाला बळी पडतो, तर बहीण भावाच्या हट्टांपुढे झुकते. मोठे होताना भाऊ बहिणीचा रक्षक बनतो. बहीण त्याचा मार्गदर्शक असते. भाऊबीज ही या नात्याच्या आठवणी जागवणारी, आपुलकी वाढविणारी आणि परत एकमेकांना जिव्हाळ्याने जोडणारी एक सुंदर परंपरा आहे. आजच्या धावपळीच्या जीवनात जेव्हा भौतिक सुखांच्या मागे धावतो आहोत, तेव्हा अशा सणांमुळे आपल्याला आपले नाते, माणसे आणि भावना यांची जाणीव होते. भाऊबीज ही फक्त औपचारिक भेटवस्तूंची देवाणघेवाण न राहता एकमेकांच्या आयुष्यात प्रत्यक्ष हजेरी लावणे, संवाद साधणे, आठवणींच्या गाठी पुन्हा एकदा घट्ट करणे, हाच खरा या सणाचा हेतू आहे. आज अनेक भावंडे दूरदेशी असली, तरी व्हिडिओ कॉल, चिठ्ठ्या, भेटवस्तूंच्या माध्यमातून हे नाते अजूनही घट्ट आहे. काळ बदलतोय, पण नात्यांची ऊब आणि भावनांची सखोलता अजूनही तशीच आहे. भाऊबीज म्हणजे केवळ एक सण नव्हे, तर भावाच्या मळवटावर बहिणीच्या ओवाळणीने सजलेली एक भावनिक कविता आहे. जिचे शब्द नसले तरी अर्थ अमर आहे.

# आकाशकंदिलाचे शास्त्रीय महत्त्व

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



आश्विन शुद्ध एकादशी ते कार्तिक शुद्ध एकादशीपर्यंत घराच्या बाहेर एक उंच खांब पुरून त्यावर दोरीच्या सहाय्याने जो दिवा टांगतात त्याला ' आकाशदिवा ' असे म्हणतात. त्याचा विधी पुढीलप्रमाणे असतो. घरापासून जवळच थोडी जमीन गोमयाने सारवावी. तीवर चंदनयुक्तत जलाने प्रोक्षण करून अष्टदल कमळ काढावे. मध्यभागी वीस हात, नऊ हात किंवा पाच हात लांबीचा खांब पुरावा. तो वस्त्र, पताका, अष्टघंटा, कलश यांनी सुशोभीत करावा. त्यावर अष्टदलाकृती दीप (कंदील) करून अडकवावा. त्या दीपात (कंदिलात) मोठा दिवा लावावा. त्याभोवती कमळाच्या प्रत्येक पाकळीत एक असे आठ दिवे धर्म, हर, भूती, दामोदर, धर्मराज, प्रजापती, पितर (तमःस्थित) व प्रेत यांना उद्देशून लावावे. दिव्यात तिळीचे तेल घालावे. नंतर दीपाची पंचोपचार पूजा करून तो पुढील मंत्राने वर चढवावा.

'दामोदराय नभसि तुलायां लोलया सह।
प्रदीपं ते प्रयच्छामि नमोऽनन्ताय वेधसे।।'

अर्थ : श्रेष्ठ असा परमेश्वर जो दामोदर त्याला हा ज्योतीसह दीप अर्पण करतो. त्याने माझे कल्याण करावे. याचे फल लक्ष्मीप्राप्ती आणि पितरांची तृप्ती असे आहे.

याचे फळ सर्वार्थाने समृद्धी प्राप्ती हे आहे (भारतीय संस्कृतीकोश-व निर्णयसिंधु) सध्याच्या काळात माहिती नसल्यामुळे आकाशदिवा लावण्याचा असा विधी कोणी करीत असेल, असे वाटत नाही. काही मंदिरांतून अशाप्रकारे विधी करून आकाशदिवा लावला जातो. हा एक समृद्धी प्राप्तीसाठी कुलाचार असून, सर्वांसाठी आहे. एवढे निश्चित. प्रत्येक जण दिवाळीत आपल्या घरी बाजारातून विकत आणून आकाशदिवा लावतात.